**कृपया प्रसिध्दीसाठी -** **6 जून 2013**

## भाजपा नेते व माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी गुरुवार, 6 जून 2013 रोजी मुंबई येथे पत्रकार परिषदेत वितरीत केलेले निवेदन

### *काँग्रेसच्या राजवटीत भयंकर महागाईचा आगडोंब : राम नाईक*

**मुंबई, गुरुवार :** ''काँग्रेसप्रणित युपीए सरकारच्या कारभारामुळे जीवनावश्यक गोष्टी दुर्लभ झाल्या असून भयंकर महागाईचा आगडोंब उसळला आहे. आम आदमीचे जगणे मुश्किल झाले आहे'', असे प्रतिपादन माजी पेट्रोलियम मंत्री व भारतीय जनता पार्टीच्या सुशासन प्रकोष्ठाचे राष्ट्रीय संयोजक श्री. राम नाईक यांनी केले. श्री. नाईक मुंबई येथे पत्रकार परिषदेत बोलत होते.

देशातील अग्रगण्य सर्वेक्षण संस्थेने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या सर्वेक्षणाचा हवाला देत श्री. नाईक म्हणाले, ''देशभरातील 65 टक्के मतदार युवा (35 वर्षांहून कमी) असून ते युपीए सरकारच्या महागाई व भ्रष्टाचारी कारभाराला वैतागले आहेत. आगामी निवडणुकांमध्ये देशात बदल घडविण्याची त्यांची इच्छा आहे. काँग्रेसच्या भ्रष्ट कारभारामुळे सर्व प्रकारच्या उत्पादनात घट झाली आहे. परिणामी 2012-2013 चे 'सकल देशांतर्गत उत्पन्न' (जीडीपी) 5 टक्के राहील असे भारत सरकारच्या सांख्यिकी संघटनेने जाहीर केले आहे. हा दर गेल्या 10 वर्षात सर्वांत कमी असून देशाची अर्थव्यवस्था धोक्यात असल्याचा हा इशाराच आहे''.

पंतप्रधान श्री. अटल बिहारी वाजपेयी यांच्या कारकिर्दीत एक डॉलरचा रु. 45.10 हा असलेला विनिमय दर आता 26 टक्क्यांनी कडाडून रु. 56.76 झाला आहे अशी माहिती देऊन श्री. राम नाईक म्हणाले, ''रुपयाच्या अवमूल्यनाचा तर गेल्या 11 महिन्यातील हा नीचांक आहे. याचा दूरगामी विपरीत परिणाम सर्वच जीवनावश्यक वस्तूंच्या दरवाढीवर झाला आहे. आपली आयात निर्यातीपेक्षा जास्त होत असल्याने रुपयाच्या अवमूल्यनाचा फटका भारतीय अर्थव्यवस्थेला बसत आहे. देशाला आयातीपोटी 26 टक्के जास्त किंमत द्यावी लागत आहे''.

जीवनावश्यक 21 वस्तूंच्या वाढलेल्या महागाईची विस्तृत माहिती देणारा एक तक्ताच श्री. राम नाईक यांनी पत्रकार परिषदेत सादर केला. गहू, तांदूळ, बेसन, मूग डाळ, मसुर डाळ, गूळ, दूध, चहा, अशा जीवनावश्यक वस्तूंचे भाव गेल्या नऊ वर्षांमध्ये 200 टक्क्यांहून जास्त वाढले आहेत अशी धक्कादायक

माहिती देऊन श्री. नाईक म्हणाले, ''गरीबाला कांदा - भाकरही दुरापास्त झाली आहे. कारण कांद्याचे भाव रु. 6 वरुन रु. 20 म्हणजे 233 टक्के वाढले आहेत. महागाई 100 दिवसात नियंत्रणात आणू हे पंतप्रधानानी 2009 मध्ये दिलेले आश्वासन पोकळ ठरले आहे. हा जनतेचा विश्वासघातच आहे''.

पेट्रोलियम क्षेत्रासंबंधी बोलताना श्री. नाईक म्हणाले, ''युपीए सरकारच्या कारकिर्दीत गेल्या नऊ वर्षांमध्ये डिझेल रु.22.50 प्रतिलीटर वरुन रु.57.88 (157% वाढ), पेट्रोल रु.33.15 वरुन रु.72.21 (118% वाढ) तर सर्वसामान्यांचे इंधन असलेले केरोसिन रु.18 वरुन रु.50 पर्यंत (178%वाढ) महाग झाले आहे. याचे कारण म्हणजे पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांच्या सरकारात चार पेट्रोलियम मंत्री झाले, परंतु त्यांनी पेट्रोलियमसारख्या आंतरराष्ट्रीय महत्त्वाच्या विषयासाठी कोणतेही ठोस धोरण आखले नाही. उलटपक्षी सुधारणांचा बडगा उभारत अनुदान काढून घ्यायला सुरुवात केली आहे. आता अनुदानयुक्त सिलेंडरची किंमत रु.244 वरुन रु.448 वर (84% वाढ) तर विनाअनुदान सिलेंडरची किंमत रु.858 (252% वाढ) झाली आहे. हे कमी होते म्हणून की काय गेल्या आठवड्यात पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह जपानमध्ये टोकियो येथे गेले असताना त्यांनी भारताला कर्ज मिळावे म्हणून 'आम्ही विकासासाठी कठोर निर्णय घेऊ' असे जपानला आश्वासन देऊन देशात आम आदमीवर अधिक बोझा टाकण्याचे सूतोवाचच केले आहे''.

रोज उठून उघडकीला येणारे हजारो कोट्यावधी रुपयांचे घोटाळे, त्यात गुंतलेले मंत्री, उच्चपदस्थ अधिकारी यांचा ओंगळवाणा भ्रष्टाचार यांमुळे महागाईचा तडाखा सोसणा-यांच्या दुःखावर डागण्या बसताहेत, असे सांगून श्री. राम नाईक म्हणाले, ''उपलब्ध सर्वेक्षणानुसार 48 टक्के मतदारांच्या मते देशापुढची सर्वात मोठी समस्या भाववाढ ही आहे, तर 17 टक्के मतदार भ्रष्टाचारामुळे चिंताग्रस्त आहेत. डिझेल, पेट्रोल, स्वयंपाकाचा सिलेंडर, केरोसिन यांचे वाढते भाव हाही काळजीचा विषय असल्याचे 10 टक्के मतदारांचे मत आहे''. महागाई विरोधात संपूर्ण देशात करावयाच्या आंदोलनाची रणनीती गोव्यात 8 व 9 रोजी होणाऱ्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत ठरविण्यात येईल, असेही श्री. नाईक यांनी शेवटी सांगितले.

**(कार्यालय सचिव)**

**सोबत : किंमतीचा तक्ता**

**6 जून 2013**

# भारतीय जनता पार्टी, मुंबई

## *जीवनावश्यक वस्तूंच्या मुंबईतील किंमती*

**(संकलक श्री.राम नाईक, श्री. गिरीधर साळुंके)**

| वस्तू | भाजपा सरकारच्या काळातील दर (प्रति किलो रु.) मे 2004 | पहिल्या कॉंग्रेस सरकारच्या काळातील दर (प्रति किलो रु.) एप्रिल 2009 | दुसऱ्या कॉंग्रेस सरकारच्या काळातील दर (प्रति किलो रु.) 3 जून 2013 | 2004 च्या तुलनेत वाढ (%प्रतिशत) |
|---|---|---|---|---|
| गहू | 9 | 20 | 28 | 211% |
| तांदूळ | 10 | 22 | 30 | 200% |
| साखर | 14 | 23 | 38 | 171% |
| चहा पावडर | 80 | 190 | 290 | 263% |
| खाद्य तेल | 40(प्रति लिटर) | 70(प्रति लिटर) | 78(प्रति लिटर) | 95% |
| डालडा | 40 | 60 | 80 | 100% |
| तूर डाळ | 30 | 100 | 80 | 167% |
| मुग डाळ | 24 | 54 | 84 | 250% |
| मसूर डाळ | 22 | 60 | 78 | 255% |
| चणा डाळ | 25 | 36 | 68 | 172% |
| गूळ | 14 | 32 | 50 | 257% |
| बेसन | 20 | 48 | 64 | 220% |
| बटाटा | 8 | 14 | 24 | 200% |
| कांदा | 6 | 16 | 20 | 233% |
| टोमॅटो | 9 | 16 | 40 | 344% |
| दूध | 14 (प्रति लिटर) | 28(प्रति लिटर) | 42(प्रति लिटर) | 200% |
| केरोसीन | 18 (प्रति लिटर) | 25 (प्रति लिटर) | 50(प्रति लिटर) | 178% |
| स्वयंपाकाचा गॅस | 244 (प्रति सिलेंडर) | 312(प्रति सिलेंडर) | 448.50(प्रतिसिलेंडर)<br>* 858 (प्रतिसिलेंडर) **विनाअनुदान** | 84%<br>252% |
| पेट्रोल | 33.15 (प्रति लिटर) | 44.60(प्रति लिटर) | 72.21(प्रति लिटर) | 118% |
| डिझेल | 22.50 (प्रति लिटर) | 34.50(प्रति लिटर) | 57.88 (प्रति लिटर) | 157% |
| सीएनजी | 19.71(प्रति किलो) | 24.65(प्रति किलो) | 33.95(प्रति किलो) | 72% |
| | | | | |
| **डॉलर $1** | **रु. 45.10** | **रु. 50.05** | **रु. 56.76** | **26%** |

***विशेष :***

**1. 2012-2013 चे 'सकल देशांतर्गत उत्पन्न'(जीडीपी) 5 टक्के राहील असे भारत सरकारच्या सांख्यिकी संघटनेने जाहीर केले आहे. हा दर गेल्या 10 वर्षात सर्वात कमी असून जणू धोक्याची घंटीच वाजवित आहे,**

**2. या शिवाय डॉलर -रुपया विनिमय दर 2004 मध्ये रु. 45.10 होता तो आता रु. 56.76 म्हणजे 26 टक्क्यानी वाढला आहे. याचाच अर्थ आपल्याला आयात करताना 26 टक्के किंमत जास्त द्यावी लागत आहे. गेल्या 11 महिन्यातील हा नीचांक आहे. सध्या आपली आयात निर्यातीपेक्षा जास्त होत असल्याने रुपयाच्या अवमूल्यनाचा फटका भारतीय अर्थव्यवस्थेला बसत आहे.**